पिंपरी चिंचवड महानगरपालिका
कामगार कल्याण विभाग
जा. क्र. काक/७/कावि/ ४३७/२०२५
दिनांक - २४/०२/२०२५

प्रति,
मा. सर्व विभागप्रमुख / शाखाप्रमुख
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**विषय –** कंत्राटी कामगारांच्या किमान वेतन दराबाबत.

**संदर्भ –** १. मा. आयुक्त सो यांचेकडील आदेश क्र. काक/३/कावि/१५४/२०१८ दि. २८/०६/२०१८
२. मा. कामगार उप आयुक्त (ग्रा.वि.) मुंबई यांचेकडील दि.२०/०२/२०२५ रोजीचे दर

महोदय,

मा. आयुक्त सो यांचेकडील उक्त संदर्भिय क्र. १ चे आदेशान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कामगारांचे तसेच महानगरपालिकेसाठी सेवा देणाऱ्या कंत्राटदारामार्फत नेमण्यात आलेल्या कंत्राटी कामगारांचे दिनांक २८/०६/२०१८ पासूनचे किमान वेतनाचे दर निश्चित करणेत आले आहे. सदर आदेशामध्ये दर सहा महिन्यांकरीता प्रसिध्द होणा-या विशेष भत्त्याचे दर कामगार कल्याण विभागाने महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावे व त्याप्रमाणे संबंधीत विभागांनी किमान वेतन दराची अदायगी करण्यात यावी असे नमूद केले आहे.

उक्त संदर्भिय क्र. २ अन्वये दिनांक ०१/०१/२०२५ ते ३०/०६/२०२५ या कालावधीतील विशेष भत्त्याचे दर प्राप्त झाले आहेत. सदरचे दर माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सोबत पाठविणेत येत आहे.

आपला विश्वासू

(प्रमोद जगताप)
कामगार कल्याण अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी –१८

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## कामगार कल्याण विभाग
### कुशल / अर्धकुशल / अकुशल कामगारांचे किमान वेतन दर खालीलप्रमाणे
(कालावधी - दिनांक ०१/०१/२०२५ ते ३०/०६/२०२५)

मा. आयुक्त सो यांचेकडील आदेश क्र. काक/३/कावि/१५४/२०१८ दिनांक २८ जून २०१८ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून

| अ. क्र. | कामगाराचा प्रकार | मुळ वेतन (अ) | विशेष भत्ता (ब) | एकुण वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | कुशल कामगार | १४,०००.०० | ९१००.०० | २३,१००.०० |
| २ | अर्धकुशल कामगार | १३,०००.०० | ९१००.०० | २२,१००.०० |
| ३ | अकुशल कामगार | ११,५००.०० | ९१००.०० | २०,६००.०० |

कंत्राटी कामगारांना मूळ वेतन + विशेष भत्ता या एकत्रित रक्कमेवर खालीलप्रमाणे भत्ते देय राहतील.

| अ. क्र. | तपशिल | मालकाचा हिस्सा |
|---|---|---|
| १ | घरभाडे (अ+ब यावर) | ५% |
| २ | ई.पी.एफ. (र.रु. १५०००/- पर्यंत) | १३% |
| ३ | बोनस (अ+ब यावर) | ८.३३% |
| ४ | रजा वेतन (अ+ब यावर) | ५.७७% |
| ५ | कामगार कल्याण निधी (दर सहामाही) | रु. ७५/- |
| ६ | सेवा शुल्क (अ+ब यावर) अथवा निविदा स्विकृतीचे दराप्रमाणे | ५% |

वरील प्रमाणे मनपातील सर्व कामगारांना वेतन अदा करणे आवश्यक आहे.

(प्रमोद जगताप)
कामगार कल्याण अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी –१८